



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ४४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


# न्यायव्यवस्थेचे ऐतिहासिक पाऊल: ट्रान्सजेंडर महिलांना मिळणार महिलांच्या सर्व कायद्यांचे कायदेशीर संरक्षण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली / विशेष वृत्त:**

भारतीय न्यायव्यवस्थेत मानवी हक्कांच्या आणि समानतेच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि क्रांतीकारक पाउल उचलण्यात आले आहे. बॉम्बे उच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निर्णयात स्पष्ट केले आहे की, जर एखादी पीडित व्यक्ती स्वतःची ओळख महिला म्हणून सांगणारी ट्रान्सजेंडर महिला असेल, तर तिच्याबाबतीतही भारतीय न्याय संहितेच्या कलम ७७ अंतर्गत 'महिलेचा विनयभंग' करण्याचा गुन्हा लागू केला जाऊ शकतो. या निर्णयामुळे आता ट्रान्सजेंडर महिलांना महिला संरक्षणाशी संबंधित सर्व कायदेशीर बाबींचे आणि हक्कांचे संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**निर्णयाची महत्त्वाची वैशिष्ट्ये व पार्श्वभूमी**

* न्यायालयाचा दृष्टिकोन: न्यायव्यवस्थेने कायद्याचा अर्थ लावताना केवळ शाब्दिक भिंती न उभारता सामाजिक वास्तवाला आणि मानवी अस्मितेला प्राधान्य दिले आहे. न्यायालयाच्या मते, ट्रान्सजेंडर महिला ज्या स्वतःची ओळख महिला म्हणून स्पष्ट करतात, त्यांना इतर महिलांप्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळण्याचा पूर्ण अधिकार आहे.
* संबंधित खंडपीठ व दिनांक: हा अत्यंत संवेदनशील आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय बॉम्बे उच्च न्यायालयाचे एकल न्यायाधीश न्यायमूर्ती मेहरोझ पठाण यांनी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिला आहे.
* प्रकरणाची पार्श्वभूमी: भारतीय लष्करात 'अग्निवीर' म्हणून सेवा बजावलेला विशाल इंगळे या आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीने या प्रकरणातून आपल्याला दोषमुक्त करण्यासाठी याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत आरोपीची याचिका फेटाळून लावली आणि खटला सुरू ठेवण्याचे आदेश दिले.

**या निर्णयाचे दूरगामी सामाजिक आणि कायदेशीर महत्त्व**

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. परंतु, प्रत्यक्षात ट्रान्सजेंडर समुदायाला अनेकदा कायदेशीर अस्पष्टता आणि सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागतो. याआधी, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदेशीर कलमांचा विस्तार ट्रान्सजेंडर व्यक्तींवर कसा लागू करावा, याबाबत कायदेशीर अस्पष्टता होती. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या या ताज्या निर्णयामुळे ती अस्पष्टता दूर झाली आहे.

या निकालानंतर कायदेशीर जाणकारांच्या मते, हा निर्णय केवळ एका खटल्यापुरता मर्यादित नसून, संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी एक मजबूत पायंडा प्रस्थापित करणारा आहे. यामुळे ट्रान्सजेंडर समुदायातील महिलांवरील अन्याय, अत्याचार आणि छळाविरुद्ध आवाज उठवण्याला मोठे कायदेशीर बळ मिळाले आहे.

**नैतिक आणि मानवी दृष्टिकोन**

नैतिकदृष्ट्या विचार केल्यास, हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह मानला जात आहे. कोणत्याही व्यक्तीची ओळख ही तिच्या आत्मसन्मानाशी जोडलेली असते. जेव्हा एखादी ट्रान्सजेंडर व्यक्ती स्वतःची ओळख 'महिला' म्हणून प्रस्थापित करते, तेव्हा तिच्या सुरक्षिततेची आणि सन्मानाची जबाबदारी समाज आणि कायदा या दोघांवरही येते. या निर्णयामुळे न्यायव्यवस्था ही केवळ रूढ कायद्यांचे पालन करणारी यंत्रणा नसून, ती सामाजिक न्याय देणारी संवेदनशील यंत्रणा आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## गोकुळवर कब्जा करायचा नाही म्हणे! मग संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याची सरकारला एवढी घाई का?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई : वृत्तसंस्था**

सहकारी संस्थांमध्ये लोकशाही चालावी, संचालकांनी कारभार करावा आणि अध्यक्ष निवडून यावा, ही अपेक्षा असते. पण कोल्हापूरच्या गोकुळमध्ये अध्यक्ष निवडण्यासाठी आवश्यक कोरमच पूर्ण होत नसल्याने आता राज्य सरकारने नामनिर्देशित संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकार म्हणते, कब्जा करण्याचा हेतू नाही; मात्र विरोधकांना या निर्णयामागे राजकीय हस्तक्षेपाचा वास येत आहे.



ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना गोकुळचा ताबा घेण्याचा कोणताही हेतू नसल्याचे सांगितले. निवडणुकीनंतर दोन्ही गटांकडे अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक संख्याबळ नसल्याने निवडणूक रखडली आहे. न्यायालयाने १० तारखेला निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, पुन्हा कोरम पूर्ण न झाल्यास संस्थेचा पेच अधिक गंभीर होऊ शकतो.

गोकुळच्या कायद्यानुसार सलग तीन वेळा निवडणूक होऊ शकली नाही, तर संबंधित अधिकार जिल्हा उपनिबंधकांकडे जाऊ शकतात. निवडून आलेल्या संचालकांचे अधिकारही अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नामनिर्देशित संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

हसन मुश्रीफ, विनय कोरे आणि सतेज पाटील यांनी एकत्र बसून तोडगा काढावा, असे आवाहनही त्यांनी केले. हा निर्णय मंत्रिमंडळाने एकमताने घेतल्याचे आणि महाधिवक्त्यांचा सल्ला घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पण प्रश्न असा आहे की, सहकारी संस्थांमधील अंतर्गत राजकीय संघर्ष सोडवण्याची जबाबदारी सरकारची की सभासदांची? प्रत्येक वेळी सत्ता हस्तक्षेप करणार असेल, तर सहकारातील स्वायत्ततेचे काय? सरकारचा हेतू कब्जा करण्याचा नसल्याचा दावा मान्य केला, तरी निर्णयाचे परिणाम काय होतील, हे महत्त्वाचे आहे. सहकार वाचवण्याच्या नावाखाली सहकाराच्या स्वायत्ततेलाच धक्का बसणार नाही ना?

## सवर्ण नाराज होताच केंद्र सरकारची माघार; यूजीसीच्या समानता नियमांवर भाजपचा राजकीय यू-टर्न!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

विद्यापीठांमधील जातीय भेदभाव रोखण्यासाठी नियम तयार करायचे, त्यात ओबीसी विद्यार्थ्यांचाही समावेश करायचा आणि विरोध सुरू होताच पुनरावलोकन समिती नेमायची! केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे यूजीसीच्या समानता नियमांवरून नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर ठाम भूमिका घेण्याऐवजी सरकारने राजकीय नाराजीचा अंदाज घेऊन सावध पवित्रा घेतल्याची टीका होत आहे.




यूजीसीच्या २०२६ मधील नव्या नियमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसोबत ओबीसी विद्यार्थ्यांनाही जातीय भेदभावापासून संरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. मात्र, कथित खोट्या तक्रारींचा गैरवापर होऊ शकतो, तक्रारदारांवर कारवाईची तरतूद नाही, असे आक्षेप सवर्ण संघटनांकडून घेण्यात आले. त्यानंतर केंद्राने नियमांच्या पुनरावलोकनासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

आता खरी गंमत उत्तर प्रदेशच्या राजकारणात आहे. आगामी २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत सवर्ण, ओबीसी आणि दलित मतदारांचे गणित भाजपसाठी निर्णायक ठरणार आहे. सवर्णांची नाराजी परवडणारी नाही आणि ओबीसींच्या सामाजिक न्यायाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणेही शक्य नाही. म्हणजे नियम बनवताना विद्यार्थ्यांचा विचार आणि त्यांची अंमलबजावणी करताना मतदारांचा विचार, असा विरोधाभास!

भाजप नेते विनोद तावडे यांनी समितीचा उद्देश कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ न देणे असल्याचे सांगितले. दुसरीकडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनीही नियमांमधील असंतुलनाबाबत संघाने सरकारला अवगत केल्याचे स्पष्ट केले.

## फार्मर आयडीसाठी दीड लाख शेतकऱ्यांना सरकारचा दिलासा; पण इतकी वर्षे शेतकरी डिजिटल व्यवस्थेबाहेर का?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नागपूर / प्रतिनिधी**

शेतात घाम गाळणारा शेतकरी सरकारच्या डिजिटल यंत्रणेत मात्र अस्तित्वातच नाही, अशी विचित्र परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली होती. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या तब्बल १ लाख ६० हजार शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नसल्याने ते केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभांपासून वंचित राहिले. आता अखेर सरकारला या शेतकऱ्यांची आठवण झाली असून त्यांना फार्मर आयडी देण्यासाठी विशेष मानक कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ७ नोव्हेंबर रोजी नागपुरात ही माहिती दिली. १ जानेवारी २०१५ पूर्वी जमीन वाटप झाल्याचा किंवा संबंधित जमीन प्रत्यक्ष कसत असल्याचा एक पुरावा उपलब्ध असला तरी पात्र शेतकऱ्यांना फार्मर आयडी दिला जाणार आहे.

उत्तर महाराष्ट्रातील जहागीरदार, मराठवाड्यातील मदतमास आणि खिदमतमास तसेच विदर्भातील सीलिंग कायद्यांतर्गत जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना महसुली अभिलेखांतील अपुऱ्या नोंदींचा फटका बसत होता. म्हणजे शेतात पीक उभे असले, तरी सरकारी कागदपत्रांमध्ये शेतकऱ्याची ओळखच अपुरी!

नव्या निर्णयामुळे पीक कर्ज, पीकविमा, अनुदान आणि अन्य सरकारी योजनांचे दरवाजे उघडण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, फार्मर आयडीमुळे जमिनीच्या मालकी हक्कात बदल होणार नाही.

## दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाचा मुहूर्त ठरला? १० नोव्हेंबरच्या बैठकीकडे लक्ष;

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पणजी / वृत्तसंस्था**

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

पेट्रोलच्या दरांनी आधीच सामान्य वाहनधारकांचे कंबरडे मोडले आहे. त्यात आता पेट्रोलमध्ये किती इथेनॉल मिसळले जात आहे, यावरून नवा वाद पेटला आहे. ई-२० पेट्रोलमध्ये निर्धारित २० टक्क्यांपेक्षा अधिक इथेनॉल मिसळले जात असल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, काही नमुन्यांमध्ये इथेनॉलचे प्रमाण तब्बल ३० ते ३१ टक्क्यांपर्यंत आढळले आहे.

कर्नाटकातील मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासलेल्या १४ नमुन्यांपैकी ११ नमुन्यांमध्ये निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक इथेनॉल असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या एका नमुन्यात ३१.२ टक्के, तर हिंदुस्तान पेट्रोलियमच्या नमुन्यात ३०.५ टक्के इथेनॉल आढळल्याचे त्यांनी सांगितले.

'ई-२० चे रूपांतर आता ४२० मध्ये झाले आहे,' असा उपरोधिक टोला लगावत राहुल गांधी यांनी पेट्रोल कंपन्या आणि केंद्र सरकारवर निशाणा साधला. ग्राहक पैसे मात्र पेट्रोलचे मोजतो; पण त्याच्या वाहनात नेमके कोणत्या प्रमाणात इंधन भरले जात आहे, याची माहिती मिळते का, हा त्यांनी उपस्थित केलेला महत्त्वाचा प्रश्न आहे. इथेनॉलचे माण वाढल्यास काही वाहनांमध्ये मायलेज, इंजिनची कार्यक्षमता आणि देखभाल खर्चावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र, या आरोपांची अधिकृत प्रयोगशाळीय पडताळणी आणि कंपन्यांची भूमिका अद्याप स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आता सरकारने केवळ इथेनॉल मिश्रणाचे फायदे सांगून चालणार नाही. पेट्रोल पंपावर मिळणाऱ्या इंधनाची गुणवत्ता, प्रत्यक्ष मिश्रणाचे प्रमाण आणि तपासणी अहवाल सार्वजनिक करावे लागतील. कारण ग्राहकाला इंधन विकताना पारदर्शकता दाखवणे ही कृपा नाही, तर जबाबदारी आहे. राहुल गांधींचे आरोप खरे की खोटे, यापेक्षा सरकार या प्रश्नांची उत्तरे कधी देणार, हा खरा मुद्दा आहे.

## NEET-UG कॉउन्सेलिंग घोटाळा: स्वातंत्र्यसैनिकांच्या कोट्यात बनावट दाखल्यांचा महाघोटाळा; उत्तराखंड उच्च न्यायालयाचे चौकशी आणि कारवाईचे कठोर आदेश

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**डेहराडून / नैनिताल: विशेष वृत्त**

देशातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेतील (NEET-UG 2026) पारदर्शकतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांसाठी (¦ependents of FA°eedom FighteA°s) राखीव असलेल्या कोट्यात बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश मिळवण्याच्या प्रयत्नांवर उत्तराखंड उच्च न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. उच्च न्यायालयाच्या प्रभारी मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत गृह आणि महसूल सचिवांना विशेष पडताळणी समिती स्थापन करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

न्यायालयाचे मुख्य आदेश आणि दिशा-निर्देश

**Bullet** विशेष पडताळणी समितीची स्थापना: उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती मनोज कुमार तिवारी आणि न्यायमूर्ती सुभाष उपाध्याय यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला पुढील ४ आठवड्यांत विशेष समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

**Bullet** तपासाची व्याप्ती आणि मुदत: ही समिती केवळ प्रमाणपत्रांची वैधता तपासणार नसून तहसील, महसूल निरीक्षक, सीएसजी केंद्र व इतर संबंधित सरकारी अधिकाऱ्यांची भूमिका तपासणार आहे. समितीला ६ महिन्यांच्या आत आपला चौकशी अहवाल सरकारला सादर करावा लागेल.

**Bullet** दोषींवर कारवाई आणि प्रवेश रद्द: अहवाल प्राप्त झाल्यानंतर बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे आरक्षित जागा बळकावणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील आणि प्रमाणपत्रे जारी करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल.




प्रकरणाची गंभीर पार्श्वभूमी

'नॅशनल पब्लिक सर्व्हिस ट्रस्ट'तर्फे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत (PIL) हा प्रकार उघडकीस आला. याचिकाकर्त्यांच्या दाव्यानुसार, छएएढ-णऋ २०२६ च्या कॉउन्सेलिंगमध्ये स्वातंत्र्यसैनिक कोट्यातून अर्ज करणाऱ्या २४ पैकी १६ उमेदवारांची प्रमाणपत्रे संशयास्पद किंवा बनावट आढळली होती. प्राथमिक तपासात तथ्य आढळल्याने काही वैद्यकीय प्रवेश आधीच रद्द करण्यात आले असून विशेष तपास पथकाद्वारे (SIT) मध्यस्थ व इतर सूत्रधारांना अटक करण्यात आली आहे.

प्रशासकीय पारदर्शकता आणि न्यायव्यवस्थेची दक्षता

आरक्षणाचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवण्याऐवजी बनावट कागदपत्रांच्या आधारे तो लाटण्याचा प्रयत्न प्रशासकीय त्रुटी आणि भ्रष्टाचाराकडे बोट दाखवतो. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारला एक कायमस्वरूपी पडताळणी समिती (PeA°manent VeA°ification Committee) स्थापन करण्याचा सल्ला दिला आहे, जी वेळोवेळी प्रमाणपत्रांची यादृच्छिक (ठरपवेा) तपासणी करेल.

न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे पात्र व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण होण्यास मदत होणार असून प्रशासनातील त्रुटी दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## संपादकीय

### सहकाराचा 'स्वार्थ-कार' आणि गोकुळचा बळी

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राची मूळ संकल्पना ही ''सहकारातून समृद्धी'' अशी होती. शेतकरी, कष्टकरी आणि तळागाळातील घटकांना एकत्र आणून आर्थिक स्वयंपूर्णता मिळवणे हा त्यामागचा उदात्त हेतू होता. मात्र, वर्तमानात महाराष्ट्राच्या राजकारणाने या संकल्पनेला पुरते ओरबाडून काढले असून, आता ''सहकारातून सत्ता आणि खुर्ची'' असा नवा पायंडा पडताना दिसत आहे. या राजकीय साठमारीचा ताजा बळी ठरतोय तो पश्चिम महाराष्ट्राची आर्थिक वाहिनी आणि कोल्हापूरची अस्मिता असलेला 'गोकुळ' (कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ).

गोकुळ हा केवळ एक दूध संघ नसून, ५ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांचा जीवनधार आहे. ३,७०० हून अधिक प्राथमिक दूध संस्थांशी जोडलेल्या या संघाचे दैनिक संकलन १४ ते १५ लाख लीटर इतके प्रचंड असून, वार्षिक टर्नओव्हर ३,७०० कोटी रुपयांहून अधिक आहे. दुधाचे हे संकलन आणि त्यासोबत येणारा अथांग पैसा हीच राजकीय नेत्यांसाठी सर्वात मोठी 'मलाई' ठरली आहे. कोल्हापूरच्या राजकारणात असा एक अलिखित नियम मानला जातो की, ज्याची सत्ता गोकुळवर, त्याचाच वरचष्मा संपूर्ण जिल्ह्यावर! म्हणूनच, राज्यातील सत्तांतराच्या लाटा ज्या-ज्या वेळी उठतात, त्या-त्या वेळी गोकुळच्या अध्यक्षपदाची आणि संचालक मंडळाची खुर्ची बळकावण्यासाठी सत्ताधाऱ्यांची चढाओढ सुरू होते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील (ड्शलींळेप ९७-घ व संबंधित कलमे) तरतुदींनुसार, सहकारी संस्थांचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी राज्य सरकारला काही विशिष्ट परिस्थितीत सरकारी प्रतिनिधी नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परंतु, दुर्दैवाने या कायद्याचा वापर सहकाराच्या सक्षमीकरणापेक्षा राजकीय समीकरणांसाठीच जास्त केला जात आहे. मे २०२१ मध्ये गोकुळवर महाविकास आघाडीच्या काळात आमदार सतेज पाटील आणि हसन मुश्रीफ यांच्या गटाची सत्ता आली. त्यानंतर जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात राजकीय परिवर्तन घडले आणि महायुती सरकार सत्तेवर आले. सत्तेची सूत्रे हाती येताच, सप्टेंबर २०२३ ते २०२४ या काळात महायुती सरकारने तत्परता दाखवत गोकुळवर थेट ५ सरकारी संचालक (छेाळपरींशव ृळअॅशलींऔी) नियुक्त केले.

आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम नफ्यात चालणाऱ्या गोकुळसारख्या स्वायत्त संस्थेला चालवण्यासाठी खरोखरच सरकारचा पाठींबा किंवा कुबड्यांची गरज होती का? तर स्पष्ट उत्तर 'नाही' असेच आहे. ही गरज गोकुळची नसून केवळ सत्ताधाऱ्यांच्या राजकीय फायद्याची होती. ज्या संचालकांना ५ लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मत देऊन निवडून दिलेले नाही, ते थेट मंत्रालयातील एका आदेशाच्या बळावर बैठकीत येऊन बसतात, हा सहकार तत्त्वाचा आणि लोकशाही प्रक्रियेचा थेट अवमान आहे.

या ५ सरकारी संचालकांच्या नियुक्तीमागील खरा हेतू अध्यक्षांच्या निवडीत आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये 'मतदानाचा अधिकार (तींळपस ळसहीी)' वापरून वर्चस्व मिळवणे हाच असतो. पहाटे चार वाजता उठून शेण-मूत्र उपटणारा, ढोरकष्ट करून केंद्रावर दूध घालणारा शेतकरी वर्षभर राबतो; मात्र गोकुळचा अध्यक्ष कोण होणार, याचे निर्णय मुंबईतील मंत्रालयातील आकांशी बांधलेले हे नियुक्त संचालक घेतात. याविरोधात मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. न्यायालयाने काही प्रकरणात स्थगिती दिली, तर काही वेळा या हस्तक्षेपावर कडक ताशेरेही ओढले. परंतु, न्यायव्यवस्थेने एका दरवाज्याने बाहेर काढले तरी राजकीय अध्यादेशांच्या खिडकीतून पुन्हा आत शिरण्याची चलाखी आपल्या राजकीय व्यवस्थेने साधली आहे.

या सर्व सत्ताकारणाच्या सर्कशीत खरा भरडला जातोय तो निष्पाप दूध उत्पादक शेतकरी. जेव्हा पशुखाद्याचे दर गगनाला भिडतात किंवा दुधाला रास्त भाव मिळण्यासाठी लढा उभारण्याची गरज असते, तेव्हा हे नियुक्त संचालक मूग गिळून बसतात. दुधाची विक्री वाढवणे, प्रक्रिया उद्योगाचा विस्तार करणे यापेक्षा 'आपल्या माणसांना कंत्राटे कशी मिळतील' यावरच भर दिला जातो.

कै. वैकुंठभाई मेहता आणि धनंजयराव गाडगीळ यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उभारलेल्या सहकार चळवळीचे आज 'सत्ता-कारात' रूपांतर झाले आहे. सरकारांनी आणि राजकीय पक्षांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ५ किंवा ५० संचालक नियुक्त करून संस्था ताब्यात घेता येतील; परंतु शेतकऱ्यांच्या मनात पसरलेला असंतोष डावलता येणार नाही. दुधाचा हा फेसाळलेला राग जेव्हा मतपेटीतून बाहेर पडेल, तेव्हा सहकाराचा गळा घोटणाऱ्या या राजकीय समीकरणांचे गणित कोलमडल्याशिवाय राहणार नाही!

# दिवाळीत आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये २५० अग्निशमन कर्मचारी तैनात

## २२ संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष; २० मोठ्या वाहनांसह अग्निशमन यंत्रणा २४ तास सज्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : । प्रतिनिधी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने विशेष खबरदारी घेतली आहे. शहरातील २२ संवेदनशील ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, या परिसरांमध्ये विशेष पथकांमार्फत २४ तास गस्त घालण्यात येणार आहे. यासाठी २५० कर्मचारी, २० मोठी अग्निशमन वाहने आणि सात ते आठ गस्ती वाहने सज्ज ठेवण्यात आली आहेत.

उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत असून, उपअग्निशमन अधिकारी गौतम इंगवले आणि श्रीकांत वैरागर यांच्याकडे मोहिमेचे नेतृत्व आहे. दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी, विद्युत रोषणाई, दिव्यांचा वापर आणि बाजारपेठांमधील गर्दी यामुळे आगीच्या घटना घडण्याची शक्यता असते. मागील वर्षी दिवाळीदरम्यान आगीच्या सुमारे ७० घटना घडल्या होत्या. या घटनांचा आढावा घेऊन यंदा संभाव्य धोकादायक ठिकाणी विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

अग्निशमन विभागाचे कर्मचारी दोन शिफ्टमध्ये काम करणार असून, सर्व अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दिवाळीच्या काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. शहरात नियमित गस्त घालण्यासाठी लहान वाहने, तर आगीची घटना घडल्यास तातडीने घटनास्थळी पोहोचण्यासाठी मोठी अग्निशमन वाहने तैनात करण्यात येणार आहेत.

शगुन चौक, फुगेवाडी, पिंपळे गुरव, लांडगे नाट्यगृह परिसर, मॅगझिन चौक, त्रिवेणीनगर, तापकीर चौक, चिंचवड लिंक रोड, वाकड, दत्त मंदिर रस्ता, डांगे चौक, जगताप डेअरी, रावेत आणि मुकाई चौक यांसह अन्य संवेदनशील परिसरांमध्ये विशेष गस्त घालण्यात येणार आहे. या ठिकाणी परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

फटाके फोडताना खबरदारी घेण्याचे आवाहन

फटाके फोडताना गर्दीची ठिकाणे, इमारती आणि वाहनांपासून सुरक्षित अंतर राखावे. नायलॉन किंवा सिंथेटिक कपड्यांऐवजी सुती कपडे वापरावेत. न फुटलेले फटाके पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये. गॅस सिलिंडर, विद्युत तारा, पेट्रोल-डिझेल तसेच ज्वलनशील पदार्थांच्या जवळ फटाके फोडू नयेत. फटाके फोडताना जवळ पाण्याची बादली किंवा अग्निशमनाची साधने ठेवावीत. लहान मुलांवर विशेष लक्ष द्यावे. आग लागल्यास तातडीने अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दिवाळीच्या काळात नागरिकांची सुरक्षितता ही महापालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि साधनसामग्रीसह अग्निशमन विभाग सज्ज ठेवण्यात आला आहे. नागरिकांनीही सुरक्षिततेचे नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. तर, मागील वर्षातील अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा, असे घटनांचा अभ्यास करून शहरातील २२ संवेदनशील ठिकाणे निश्चित केली आहेत. २५० कर्मचारी आणि अग्निशमन वाहनांच्या माध्यमातून २४ तास यंत्रणा कार्यरत राहणार आहे. नागरिकांनी फटाके फोडताना आवश्यक खबरदारी घ्यावी, असे मुख्य अग्निशमन अधिकारी व्यंकटेश दुर्वास यांनी सांगितले.



**पिंपरी-चिंचवडमधील अग्निशमन केंद्रांचे संपर्क क्रमांक**

| अग्निशमन केंद्र | संपर्क क्रमांक |
|---|---|
| पिंपरी (मुख्य) | ९९२२५०१४७५ |
| भोसरी | ९९२२५०१४७६ |
| प्राधिकरण | ९९२२५०१४७७ |
| रहाटणी | ९९२२५०१४७८ |
| चिखली | ८६६९८९४१०१ |
| तळवडे | ९५५२५२३१०१ |
| थेरगाव | ७०३०९०७९९९ |
| मोशी | ७२६४९४३३३३ |
| चोवीसावाडी | ७७५८९९२८१७ |
| नेहरूनगर | ८४८४८८४१०१ |

## भाजपचे ज्येष्ठ नेते अंकुशराव लांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

### शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी वाहिली श्रद्धांजली



■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते आणि भाजपचे दिवंगत शहराध्यक्ष स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी (दि. ७) भाजपच्या शहर कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

भाजपचे विद्यमान शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे यांच्या हस्ते लांडगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही लांडगे यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

या वेळी जिल्हा महामंत्री मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, नगरसेवक निखिल बोहाडे, चंद्रकांत नखाते, पक्षाचे प्रवक्ते राजाभाऊ दुर्गे, संतोष तापकीर, देवदत्त लांडे, रवींद्र देशपांडे, दिलीप राऊत, रवींद्र नांदुरकर, रामदास काळजे, संजय परळीकर, मनीष पंजाबी, नंदूकाका भोगले यांच्यासह भाजपचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## चीन सीमेपासून अवघ्या २५ किमी अंतरावर भारताची ऐतिहासिक कामगिरी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : । प्रतिनिधी

भारत आणि चीनमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर म्हणजेच एलएसीवर सामरिक स्पर्धा सुरू असतानाच भारतीय हवाई दलाने लडाखमध्ये एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. रशियन बनावटीच्या आयएल-७६ या महाकाय मालवाहू विमानाने पूर्व लडाखमधील न्योमा हवाई तळावर तब्बल १३ हजार ६०० फुटांपेक्षा अधिक उंचीवर यशस्वी लँडिंग केले आहे. भारतीय हवाई दलाच्या म्हणण्यानुसार, जगात या प्रकारच्या विमानाने केलेले हे आतापर्यंतचे सर्वाधिक उंचीवरील लँडिंग आहे.

विशेष म्हणजे, न्योमा हवाई तळ चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या कामगिरीला केवळ विमानाचे यशस्वी लँडिंग म्हणून पाहता येणार नाही, तर भारताच्या सीमावर्ती भागातील लष्करी पायाभूत सुविधांच्या दृष्टीनेही त्याला महत्त्व आहे. आयएल-७६ हे भारतीय हवाई दलातील अवजड वाहतूक विमान असून, सैनिक, लष्करी उपकरणे, वाहने आणि आवश्यक सामग्रीची वाहतूक करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. अत्यंत उंचीवर, विरळ हवेत आणि आव्हानात्मक भौगोलिक परिस्थितीत अशा मोठ्या विमानाचे लँडिंग करणे हे तांत्रिक आणि वैमानिक कौशल्याच्या दृष्टीने मोठे आव्हान मानले जाते. भारतीय हवाई दलाने या कामगिरीचे श्रेय विमानाच्या क्षमतेसोबतच वैमानिक आणि संपूर्ण पथकाच्या अचूक नियोजनाला, कौशल्याला आणि व्यावसायिकतेला दिले आहे. दरम्यान, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेलगतच्या हवाई तळांचा आणि ॲडव्हान्स्ड लँडिंग ग्राउंड्सचा विकास करण्यावर संरक्षण मंत्रालयाने लक्ष केंद्रित केले आहे. लष्कराच्या कार्यात्मक गरजांनुसार या सुविधा अधिक सक्षम केल्या जात आहेत. मात्र, चीनलगतच्या सीमावर्ती भागात पायाभूत सुविधांचा विकास हा केवळ प्रतिष्ठेचा विषय नसून राष्ट्रीय सुरक्षेचा महत्त्वाचा भाग आहे. अशा दुर्गम भागात आपत्कालीन परिस्थितीत किती वेगाने सैन्य, शस्त्रसामग्री आणि रसद पोहोचवता येते, यावरच या सुविधांची खरी उपयुक्तता ठरणार आहे. न्योमा येथील ही ऐतिहासिक कामगिरी भारताच्या हवाई वाहतूक क्षमतेतील महत्त्वाचा टप्पा ठरली आहे.

# आयटकच्या नेतृत्वाखाली शालेय पोषण आहार कर्मचारी व अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचरांचा जिल्हा परिषदेसमोर भव्य मोर्चा

## महिन्यांचा थकीत पगार, सेवेत कायम करणे आणि ३० हजार रुपये वेतनासह विविध मागण्यांसाठी आंदोलन; आठ दिवसांत पोषण आहार कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याचे मुख्याधिकाऱ्यांचे आश्वासन




■ सोलापूर/बार्शी : शालेय पोषण आहार कर्मचारी आणि अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आयटकच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्हा परिषदेसमोर भव्य मोर्चा काढण्यात आला. कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते. विविध मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधले.

मोर्चाचे निवेदन देण्यासाठी विलंब होत असल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या आवारात प्रवेश करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांनी कर्मचाऱ्यांना अडवले. त्यानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने संघटनेच्या शिष्टमंडळाला मुख्याधिकाऱ्यांकडे चर्चेसाठी पाठविण्यात आले. या वेळी संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी जैन यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

मुख्याधिकारी जैन यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली. सर्व मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन आठ दिवसांच्या आत अदा करण्यात येईल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचे गेल्या सात महिन्यांपासून प्रलंबित असलेले वेतन तातडीने अदा करावे, बोनस आणि गणवेशासाठी प्रत्येकी दीड हजार रुपये द्यावेत, कर्मचाऱ्यांकडून बॉण्ड लिहून घेण्याची पद्धत बंद करून त्यांना सेवेत कायम करावे, इंधन व भाजीपाला खरेदीची बिले थेट कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावीत, तसेच कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन ३० हजार रुपये करावे, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करून ३० हजार रुपये मासिक वेतन द्यावे, दीड हजार रुपये बोनस मिळावा, प्राथमिक आरोग्य केंद्रात कामासाठी बोलावण्यात आल्यास प्रवास भत्ता आणि भोजन भत्ता द्यावा, गणवेशासाठी दीड हजार रुपये द्यावेत, स्वच्छतेसाठी आवश्यक असणारी सर्व साधने उपलब्ध करून द्यावीत आणि कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या अधिकृत कामाच्या स्वरूपानुसारच म्हणजेच जॉब चार्टप्रमाणे काम करून घ्यावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

अनेक महिन्यांपासून वेतन रखडल्याने आणि विविध मागण्या प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे मोर्चादरम्यान दिसून आले. मुख्याधिकाऱ्यांनी आठ दिवसांत शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याचे आश्वासन दिल्याने कर्मचाऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, केवळ आश्वासन न देता सर्व मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

या मोर्चात कॉम्रेड डॉ. प्रवीण मस्तुद, कॉम्रेड लहू आगलावे, कॉम्रेड यशवंत फडतरे, कॉम्रेड राजेंद्र करली, कविता घळके, दीपक शिलेदार, विद्या झेंडे, बेबीताई कनिचे, अभिजित संघेकर, भारत लोखंडे यांच्यासह आयटकचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तांदळाच्या दरवाढीने सरकारची धावपळ!

पुणे : प्रतिनिधी

देशात महागाईचा आलेख चढत असताना आता तांदळाच्या वाढत्या किमतींनी केंद्र सरकारची चिंता वाढवली आहे. अपुरा आणि अनियमित मान्सून, त्यातून प्रभावित झालेले पीक उत्पादन आणि बाजारातील वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर तांदळाची साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले उचलली आहेत. मात्र, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवण्याची वेळ सरकारवर का आली, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

शनिवारी, ७ नोव्हेंबर २०२६ रोजी केंद्र सरकारने देशभरातील व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, मोठ्या रिटेल साखळ्या, प्रक्रिया उद्योग आणि राइस मिलर्स यांना तांदूळ आणि धानाच्या साठ्याची माहिती जाहीर करण्याचे निर्देश दिले. अन्न मंत्रालयाने ६ नोव्हेंबर रोजी यासंदर्भात आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार बासमती तांदूळ, बिगर बासमती प्रीमियम तांदूळ, सामान्य बिगर बासमती तांदूळ, उकडा तांदूळ, तुटलेला तांदूळ आणि धान अशा सहा श्रेणींमध्ये साठ्याची माहिती द्यावी लागणार आहे. विशेष म्हणजे, संबंधित सर्व घटकांना दर शुक्रवारी केंद्र सरकारच्या फूड स्टॉक पोर्टलवर आपल्या साठ्याची अद्ययावत माहिती नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवळ साठ्याची माहिती मागवण्यापुरतेच केंद्र सरकार थांबलेले नाही. साठेबाजीला आळा घालण्यासाठी पाच दक्षिण भारतीय राज्यांना तांदूळ आणि धानाच्या साठ्यावर मर्यादा लागू करण्याची परवानगीही देण्यात आली आहे. त्यामुळे बाजारातील उपलब्धता आणि व्यापाऱ्यांकडील साठ्यावर सरकारचे अधिक बारकाईने लक्ष राहणार आहे.

# धामणीत ९ नोव्हेंबरला सोमवती शाहीस्नान सोहळा

## खंडोबा-म्हाळसाईच्या मुखवट्यांना पारंपरिक पद्धतीने शाहीस्नान; भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थानात सोमवारी (दि. ९) पारंपरिक सोमवती शाहीस्नान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त देवस्थान परिसरात ग्रामस्थ आणि सेवेकऱ्यांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

सोमवती अमावस्या धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. या दिवशी भगवान महादेव आणि पार्वतीचे अवतार मानल्या जाणाऱ्या श्री खंडेराय व म्हाळसाई यांची पूजा केल्याने सुख-समृद्धी प्राप्त होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. रविवारी (दि. ८) दुपारी १२ वाजून ५८ मिनिटांनी अमावस्या सुरू होणार असून, सोमवारी दुपारी ढीड वाजेपर्यंत तिचा कालावधी आहे. त्यामुळे सोमवती अमावस्येचा उपवास सोमवारीच करावा, असे वेदाचार्य मरकळे गुरुजी (आळंदी) यांनी सांगितले.

सोमवारी पहाटे ५ वाजता मंदिरात मानाच्या काठ्यांचे पूजन करण्यात येईल. त्यानंतर मानकरी नरके मंडळी (तळेगाव ढमढेरे), राजगुरू मंडळी (अवसरी खुर्द), पंचरास मंडळी (संविदणे व धामणी), कांदळकर मंडळी (कवठे), गावडे



मंडळी (वाघाळे), आवटे व पडवळ मंडळी (महाळुंगे), वाळुंज मंडळी (खडकवाडी, लोणी), भूमकर मंडळी (राऊतवाडी) आणि मेंगडे मंडळी (मेंगडेवाडी) यांच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंगाचा रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक व आरती होणार आहे.

सकाळी ७ वाजता पंचधातूचे श्री खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांचे मुखवटे पालखीतून पारंपरिक वाद्यांच्या गजरात देवमळ्यातील विहिरीवरील सोमवती स्नानस्थळी नेण्यात येतील. तेथे सोमवतीच्या ओट्यावर मानकरी व भाविकांच्या हस्ते देवाच्या मुखवट्यांना शाहीस्नान घालण्यात येईल.

त्यानंतर सेवेकऱ्यांकडून पारंपरिक पूजा व आरती केली जाईल. पुढे पालखीची वाजतगाजत शाही मिरवणूक काढण्यात येणार आहे. सोमवती सोहळा आणि श्री खंडोबाच्या दर्शनासाठी पुणे, नगर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, भोसरी व मुंबई परिसरातून मोठ्या संख्येने भाविक येण्याची अपेक्षा आहे. देवकार्य आणि तळीभंडारासाठी भाविकांची उपस्थिती राहणार असून, दर्शनासाठी येणाऱ्यांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

यंदा दिवाळीत येणारी ही वर्षातील शेवटची दुसरी सोमवती अमावस्या असल्याने सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामस्थांनी सोहळ्याच्या आयोजनाची तयारी पूर्ण केली असून, देवस्थानच्या वतीने प्रकाश जाधव पाटील यांनी ही माहिती दिली.

## मराठी प्रकाशनविश्वातील दीपस्तंभ हरपला; मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता यांचे निधन!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे / प्रतिनिधी

पुस्तकांचा व्यवसाय करणारे अनेक असतात; पण पुस्तकांच्या माध्यमातून संपूर्ण भाषेचे साहित्यविश्व समृद्ध करणारे मोजकेच असतात. मराठी प्रकाशन क्षेत्रात असेच भरीव योगदान देणारे ज्येष्ठ प्रकाशक आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल डी. मेहता यांचे शनिवारी, ७ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरात निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

१९६४ मध्ये कोल्हापुरातील मेहता बुक सेलर्सपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास १९७५ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसच्या स्थापनेनंतर एका नव्या टप्प्यावर पोहोचला. पुस्तकांची केवळ विक्री न करता वाचकांच्या हातात दर्जेदार साहित्य पोहोचवण्याचा ध्यास त्यांनी घेतला.

त्यांच्या नेतृत्वाखाली मेहता पब्लिशिंग हाऊसने तीन हजारांहून अधिक पुस्तकांचे प्रकाशन केले. दरवर्षी सुमारे १५० नवीन पुस्तके आणि ५० हून अधिक पुनर्मुद्रणे प्रकाशित करण्याची परंपरा त्यांनी निर्माण केली. अनेक नवोदित लेखकांना त्यांनी पहिली संधी दिली. लेखक आणि वाचक यांच्यातील दुवा म्हणून त्यांनी प्रकाशन क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली.

त्यांचे आणखी एक मोठे योगदान म्हणजे जागतिक साहित्य मराठीत आणण्याचा प्रयत्न. हिंदी, कन्नड, गुजराती, बंगाली यांसारख्या भारतीय भाषांसह जपानी, जर्मन, कोरियन आणि फ्रेंच साहित्याचे अनुवाद मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

आज वाचनसंस्कृती, पुस्तकांची विक्री आणि प्रादेशिक भाषांच्या प्रकाशनासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा काळात पुस्तकांवर निष्ठा ठेवून प्रकाशन क्षेत्राला दिशा देणारे व्यक्तिमत्त्व हरपणे ही मोठी हानी आहे.त्यांच्या पश्चात मुलगी, दोन नातू आणि नात असा परिवार आहे.

## चारा शोधायला गेलेल्या शेतकऱ्याचा वाघाने घेतला बळी; वनविभाग झोपेत, शेतकऱ्यांच्या जीवाची किंमत किती?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

आष्टी / प्रतिनिधी

शेतकऱ्याला आता शेती करताना केवळ दुष्काळ, कर्ज आणि बाजारभावाशीच लढावे लागत नाही; तर जनावरांसाठी चारा शोधतानाही मृत्यूचा सामना करावा लागत आहे. आष्टी तालुक्यातील देवळाली येथील शेतकरी देविदास टकले यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त होत आहे.

लोखंडवाडी-सोनेपठार परिसरात टकले हे जनावरांसाठी गवत कापत असताना वाघाने पाठीमागून



त्यांच्यावर झडप घातली. त्यानंतर त्यांना जंगलात फरफटत नेले. सुमारे अर्धा किलोमीटरपर्यंत ओढत नेल्यानंतर वाघाने त्यांच्या शरीराचे लचके तोडल्याचे सांगितले जात आहे. मुलाच्या आरडाओरडीनंतर वाघाने घटनास्थळावरून पळ काढला; मात्र तोपर्यंत टकले यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेमागे आणखी एक गंभीर वास्तव आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांसाठी चारा मिळवणे शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. चारा छावण्या सुरू नसल्याने शेतकऱ्यांना स्वतःचा जीव धोक्यात घालून गवत शोधावे लागत आहे.

गेल्या तीन वर्षांत आष्टी तालुक्यात वाघ आणि बिबट्याच्या हल्ल्यांत चार शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. देवळाली, बावी आणि धामणगाव परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रत्येक हल्ल्यानंतर पंचनामा, आश्वासन आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू होते. पण माणसाचा जीव गेल्यानंतर या प्रक्रियेचा उपयोग काय? वनविभागाने तातडीने गस्त, कॅमेरा ट्रॅप, प्रतिबंधात्मक उपाय आणि नागरिकांच्या सुरक्षेची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

## बुलडोझरचे राजकारण की लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न? 'माझ्यावर बुलडोझर चालवा', ममता बॅनर्जींचे भाजपला आव्हान!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

कोलकाता / वृत्तसंस्था

राजकारणात विरोधकांना उत्तर देण्यासाठी विचारांची गरज असते; पण बुलडोझरच्या भाषेतच राजकारण सुरू झाले, तर लोकशाहीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. पश्चिम बंगालमध्ये अभिषेक बॅनर्जी यांच्या निवासस्थानावर झालेल्या कथित हल्ल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. 'माझ्यावर बुलडोझर चालवा, माझ्या छातीवर चालवा,' असे थेट आव्हान त्यांनी दिल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना ममता यांनी भाजपच्या राजकारणावर संताप व्यक्त केला. कालीघाट परिसरातील कालीपूजेच्या उत्सवात अडथळे निर्माण केल्याचा आणि आपल्या पुतण्याच्या निवासस्थानावर हल्ला झाल्याचा आरोप त्यांनी केला.

अभिषेक बॅनर्जी यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये पहाटे दोनच्या सुमारास भाजपपुरस्कृत गुंडांनी त्यांच्या घरावर हल्ला केल्याचा केला.

दोन दिवस रेकी केल्यानंतर हा हल्ला झाल्याचेही त्यांनी म्हटले. गेल्या सहा महिन्यांत आपल्यावर सातवा जीवघेणा प्रयत्न झाल्याचा आरोप करत त्यांनी पोलिसांच्या कारवाईवरही प्रश्न उपस्थित केले.

मात्र, या आरोपांची स्वतंत्र पडताळणी आणि पोलिसांची अधिकृत भूमिका समोर येणे आवश्यक आहे.

पश्चिम बंगालमधील राजकारणात तृणमूल आणि भाजप यांच्यातील संघर्ष नवा नाही. पण निवडून आलेल्या खासदाराच्या घरावर हल्ला झाल्याचा आरोप होत असेल, तर तो केवळ पक्षीय वाद म्हणून बाजूला सारता येणार नाही.

ममता यांचे आव्हान राजकीय भाषण म्हणून पाहणे सोपे आहे; पण खरी कसोटी कायदा-सुव्यवस्थेची आहे. हल्ला झाला असेल तर कारवाई झाली पाहिजे आणि आरोप खोटे असतील तर तेही स्पष्ट झाले पाहिजेत. लोकशाहीत बुलडोझरची दहशत नव्हे, तर कायद्याचे राज्य चालले पाहिजे.

## पुण्यात दररोज १० हजार विद्यार्थ्यांना अक्षय पात्रकडून मध्यान्ह भोजन

### महाराष्ट्रात सहा केंद्रांद्वारे ५४ हजार विद्यार्थ्यांना भोजन; विक्रमगडमध्ये २५ हजार भोजन क्षमतेचे केंद्रीकृत स्वयंपाकगृह प्रस्तावित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

अक्षय पात्र फाउंडेशनच्या पुणे येथील केंद्रातून दररोज सुमारे १० हजार विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्यात येते. महाराष्ट्रातील ठाणे, कल्याण, भिवंडी, पनवेल, नागपूर आणि पुणे या सहा केंद्रांद्वारे एकूण ५४ हजार विद्यार्थ्यांसाठी भोजन पुरविले जाते. दरम्यान, पालघर जिल्ह्यातील विक्रमगड येथे दररोज २५ हजार भोजन तयार करण्याची क्षमता असलेले केंद्रीकृत स्वयंपाकगृह उभारण्याचा प्रस्ताव फाउंडेशनने मांडला आहे.

पुण्यातील केंद्रातून होणारा भोजनपुरवठा हा संस्थेच्या महाराष्ट्रातील उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. संस्थेच्या आकडेवारीनुसार, ठाणे येथे १५ हजार ५००, कल्याण येथे ९ हजार ५००, भिवंडी येथे १६ हजार ५००, पनवेल येथे १० हजार आणि नागपूर येथे केवळ नाश्त्यासाठी १ हजार ५०० लाभार्थ्यांना सेवा दिली जाते. पुण्यातील १० हजार लाभार्थ्यांसह महाराष्ट्रातील एकूण लाभार्थी संख्या ५४ हजार आहे.

विक्रमगडमध्ये २५ हजार भोजन क्षमतेचे स्वयंपाकगृह

पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी अक्षय पात्र फाउंडेशनने अत्याधुनिक केंद्रीकृत स्वयंपाकगृह उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे. या प्रकल्पासाठी रोटरी क्लब ऑफ मुंबईने सुमारे दीड एकर जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे. स्वयंपाकगृहाचे बांधकाम आणि पायाभूत सुविधांची उभारणी फाउंडेशनकडून देणगीदार व भागीदारांच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. विक्रमगड तालुक्यातील गृखडए २०२५-२६ च्या आकडेवारीनुसार, २७३ शाळांमध्ये एकूण २९ हजार १२४ विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेच्या २३५ शाळांतील १५ हजार ९१ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शासकीय, अनुदानित आणि अन्य पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांना पौष्टिक भोजन उपलब्ध करून देणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. पहिल्या टप्प्यात तीन हजार विद्यार्थ्यांना लाभ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे दोन ते तीन हजार विद्यार्थ्यांना भोजन देण्याचे प्रस्तावित आहे. आवश्यक शासकीय मंजुरी आणि कार्यान्वयनाची तयारी यानुसार पुढील टप्प्यांत लाभार्थ्यांची संख्या वाढविण्यात येणार आहे. अंतिम टप्प्यात दररोज २५ हजार भोजन तयार करण्याची क्षमता गाठण्याचे नियोजन आहे.

शाळेतील उपस्थिती आणि अध्ययनक्षमता वाढविण्यावर भर

अक्षय पात्र फाउंडेशन शासकीय व शासन अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन उपलब्ध करून देण्याचे काम सन २००० पासून करीत आहे. संस्थेच्या माहितीनुसार, देशभरातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील ७६ ठिकाणी, २५ हजारांहून अधिक शाळांमधील सुमारे २३.५ लाख विद्यार्थ्यांना भोजन पुरविले जाते.

पौष्टिक भोजनामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य, शाळेतील उपस्थिती, एकाग्रता आणि अध्ययनक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील गळती कमी करण्यास आणि पोषण सुरक्षा बळकट करण्यास हातभार लागू शकतो. वक्रमगड येथील प्रस्तावित प्रकल्पासाठी जिल्हा परिषद, स्वयंअर्थसहाय्यित, खासगी अनुदानित आणि नियमानुसार पात्र आदिवासी अनुदानित शाळांमध्ये भोजन योजना सुरू करण्यासाठी शासनाकडून आवश्यक परवानग्या मागण्यात आल्या आहेत. मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित शिक्षण विभागाच्या समन्वयाने प्रकल्पाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

# ओतूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; नऊ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

ओतूर :प्रतिनिधी

ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकल चोरीच्या घटनांचा तपास करताना पोलिसांना मोठे यश मिळाले असून मोटार सायकल चोरी प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे तर त्यांच्याकडून सुमारे पाच लाख रुपये किंमतीच्या नऊ चोरीच्या मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.आरोपींनी अकोले,संगमनेर,चाकण आणि ओतूर परिसरातून मोटार सायकल चोरल्याची कबुली पोलिसांना दिली असल्याचे ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी सांगितले.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ ते १ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.१० वाजण्याच्या दरम्यान ओतूर येथील चैतन्य विद्यालयासमोरील रस्त्यावरून दत्तात्रय बाळशिराम गिते (रा. ओतूर,ता.जुन्नर,जि. पुणे) यांची डिस्कव्हर मोटारसायकल (क्र.एम. एच. १४ बी.एच.६३६७) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती.या प्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २९३/२०२६,भारतीय न्याय




संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते.या पथकाकडून चोरीस गेलेल्या मोटारसायकलींचा शोध सुरू असताना ब्राह्मणवाडा ओतूर रस्त्यावर तीन संशयित डिस्कव्हर मोटारसायकलवरून जात असल्याचे पोलिसांना आढळून आले.पोलिसांनी संबंधितांना थांबवून मोटारसायकलच्या

कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली.तसेच तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तपासणी केली असता त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर संदीप गोरक्षनाथ गडख,वैभव विजय वावळे (दोघेही रा.बहिरवाडी,ता. अकोले,जि.अहिल्यानगर) आणि दीपक कुमा उंबरे (रा.मांडवे,ता.जुन्नर, जि.पुणे) या तिघांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.न्यायालयाने आरोपींना पो लीस कोठडी सुनावल्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक तपास केला.यावेळी त्यांनी त्यांचा साथीदार विशाल सुनील ठाँगीरे (रा.मुथाळणे,ता. जुन्नर,जि.पुणे) याच्या मदतीने वरील गुन्ह्यातील मोटारसायकली व्यतिरिक्त

आणखी आठ मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.या मोटार सायकल अकोले, संगमनेर,चाकण आणि ओतूर परिसरातून चोरी केल्याचे तपासात समोर आले.

पोलिसांनी आरोपींकडून एकूण नऊ मोटारसायकली जप्त केल्या आहेत.यामध्ये सहा हिरो स्प्लेंडर,एक हिरो स्प्लेंडर प्लस आणि दोन डिस्कव्हर मोटारसायकलींचा समावेश आहे.यापैकी काही मोटारसायकलींना क्रमांक नसून,एका मोटारसायकलचा इंजिन क्रमांक खोडलेला असल्याचेही आढळून आले आहे. जप्त केलेल्या मोटारसायकलींची एकूण किंमत सुमारे पाच लाख रुपये आहे.ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल,अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे,पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव,पोलीस उपनिरीक्षक आमणे,पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे,दिनेश साबळे,महेंद्र पाटील,बाळशिराम भवारी,धनंजय पालवे तसेच पोलीस कॉन्स्टेबल ज्योतीराम पवार,आशिष जगताप,श्यामसुंदर जायभाये,विशाल गोडसे आणि अतुल भेके यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## सारांश वृत्त

### दिव्यांग विद्यार्थी व तृतीयपंथी सुरक्षा रक्षक यांना फराळ वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
■ पुणे / प्रतिनिधी

पीएमसी एम्प्लॉईज युनियन, पुणे महानगरपालिका या संघटनेचा ६७ वा वार्षिक अहवाल प्रकाशन सोहळा आणि पुणे महानगरपालिका शाळेतील विशेष दिव्यांग विद्यार्थी व तृतीयपंथी सुरक्षा रक्षकांना दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमास पुण्याचे उपमहापौर श्री. परशुरामजी वाडेकर, माजी नगरसेवक मुकारी अण्णा अलगुडे , नगरसेवक सुहास टिंगरे, रवी टिंगरे, मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, मा.सह महापालिका आयुक्त उल्का कळसकर, मा.उपायुक्त माधव जगताप, मा.उपायुक्त रवी पवार, मा.मुख्य विधी अधिकारी निशा चव्हाण , मा.नगरसचिव योगिता भोसले , गोरक्षक श्री मिलिंद एकबोटे, निवृत्ती संघाचे अध्यक्ष जयवंत पवार, कार्यालय सचिव संजीव मोरे, वर्षा काळे यांच्यासह महानगरपालिकेचे विविध अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांचे मार्गदर्शन व शुभेच्छा: * मा.उपमहापौर परशुरामजी वाडेकर: अहवाल प्रकाशना निमित्त संघटनेचे अभिनंदन करत उपमहापौरांनी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच, वाढत्या पाणीटंचाई च्या पार्श्वभूमीवर सर्वांनी पाणी बचतीचा संकल्प करावा, असा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी दिला. * मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे: संघटनेच्या ६७ व्या वर्षातील यशस्वी वाटचालीचे कौतुक करत दिवटे साहेबांनी प्रशासनाकडून कर्मचार्यांच्या हितासाठी व संघटनेच्या कार्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे ठाम आश्वासन दिले. * मा.उपायुक्त माधव जगताप: आपल्या रोखठोक शैलीत भाषण करताना त्यांनी पुणे महानगरपालिके चे कामकाज आणि संघटनेचे योगदान यावर स्पष्ट विचार मांडले व उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

# महिलांच्या खात्यात ५० हजार रुपये? यूपी निवडणुकीआधी आश्वासनांची लयलूट;

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लखनौ / वृत्तसंस्था

निवडणुका जवळ आल्या की महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची आठवण राजकीय पक्षांना हमखास होते. उत्तर प्रदेशात २०२७ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू असतानाच महिलांना ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावाची चर्चा रंगली आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी महिलांना ४० हजार रुपये देण्याचे आश्वासन दिल्यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सरकारकडून ५० हजारांच्या मदतीचा विचार सुरू असल्याचे वृत्त समोर आले आहे.

मात्र, या प्रस्तावाला अद्याप अधिकृत मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे महिलांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे जमा होणार की ही केवळ निवडणुकीपूर्वीची राजकीय चर्चा ठरणार, हे स्पष्ट झालेले नाही.



मीडिया रिपोर्टनुसार, सरकार या योजनेसाठी लागणारा निधी आणि सरकारी तिजोरीवर पडणारा आर्थिक भार तपासत आहे. मदत सर्व महिलांना मिळणार की विशिष्ट आर्थिक निकष पूर्ण करणाऱ्यांनाच, याबाबतही स्पष्टता नाही. रक्कम एकरकमी मिळणार की टप्प्याटप्प्याने, याचाही निर्णय झालेला नाही.

मुख्यमंत्री कन्या सुमंगला योजना, निराधार महिला पेन्शन आणि सामूहिक विवाह योजनेत बदल करून मदत देण्याचा पर्यायही विचाराधीन असल्याचे सांगितले जाते. पात्र महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा करण्याची शक्यताही तपासली जात आहे.

उत्तर प्रदेशात सहा कोटींपेक्षा अधिक महिला मतदार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे महिलांच्या नावाने आर्थिक मदतीची घोषणा ही केवळ कल्याणकारी योजना न राहता मोठे निवडणूक अस्त्र ठरू शकते.

प्रश्न महिलांना मदत देण्याला विरोध करण्याचा नाही. उलट आर्थिक स्वावलंबनासाठी ठोस योजना हव्यात. पण निवडणुकीच्या आधी ४० हजार, ५० हजारांच्या घोषणा आणि निवडणुकीनंतर निधीअभावी योजना रखडल्या, तर महिलांनी नेमके कोणावर विश्वास ठेवायचा? घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष लाभ महत्त्वाचा!

## ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांच्या निधनाने प्रकाशन विश्वाचा मार्गदर्शक दुवा निखळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र
दिल्ली : प्रतिनिधी

मराठी प्रकाशन क्षेत्रात विश्वासार्ह व्यावसायिकता आणि प्रयोगशीलतेचा आदर्श निर्माण करणारे ज्येष्ठ प्रकाशक तथा मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता यांच्या निधनाने साहित्य आणि प्रकाशन क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अनिल मेहता यांनी पुस्तक विक्रेता म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. पुढे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या माध्यमातून त्यांनी मराठी प्रकाशन क्षेत्राला नवी दिशा दिली. नवोदित लेखक आणि कवींचा शोध घेऊन त्यांच्या साहित्याला प्रकाशनाची संधी व व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले.

मराठीतील साहित्य अन्य भाषांमध्ये आणि इतर भाषांतील साहित्य मराठीत आणण्याच्या अनुवाद उपक्रमातून त्यांनी भाषिक देवाणघेवाणीला चालना दिली. तसेच वाचक चळवळीला पाठबळ देत प्रस्थापित साहित्यिकांसह नवोदित लेखकांना वाचकांशी संवाद साधण्याची संधी मिळवून दिली.

व्यावसायिक धडाडी आणि साहित्याविषयीची आत्मीयता यांच्या बळावर त्यांनी उभारलेली वैविध्यपूर्ण ग्रंथसंपदा पुढील अनेक पिढ्यांसाठी मौल्यवान ठेवा ठरेल. त्यांच्या प्रकाशित पुस्तकांच्या माध्यमातून त्यांचे कार्य आणि स्मृती कायम जिवंत राहतील.

मेहता यांच्या निधनामुळे साहित्यिक, वाचक आणि प्रकाशक यांच्यातील महत्त्वाचा मार्गदर्शक दुवा हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीयांसह साहित्य आणि प्रकाशन क्षेत्रातील सर्वांच्या दुःखात सहभागी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## भारत-युरोप महासहकार्याचा नवा अध्याय! ९३.५ अब्ज युरोच्या संशोधन कार्यक्रमात भारताचा प्रवेश;

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली :प्रतिनिधी

भारत आणि युरोपीय महासंघाच्या आर्थिक आणि धोरणात्मक संबंधांना नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. भारत आणि युरोपीय महासंघाने (एण) तब्बल ९३.७ अब्ज युरोच्या 'होरायझन युरोप' या जागतिक संशोधन आणि नवोन्मेष कार्यक्रमात भारताच्या सहभागाबाबतच्या वाटाघाटी पूर्ण केल्या आहेत. या निर्णयामुळे भारतीय संशोधक, विद्यापीठे, वैज्ञानिक संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांसाठी युरोपसोबत संयुक्त संशोधनाचे नवे मार्ग खुले होणार आहेत.

विशेष म्हणजे, भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यात प्रस्तावित असलेल्या ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे भारत-युरोप संबंध केवळ आयात-निर्यातीपुरते मर्यादित न राहता संशोधन, तंत्रज्ञान, औद्योगिक विकास आणि नवोन्मेषापर्यंत विस्तारण्याचे संकेत मिळत आहेत. 'होरायझन युरोप' हा २०२१ ते २०२७ या कालावधीसाठी ९३.७ अब्ज युरो निधी असलेला युरोपीय महासंघाचा प्रमुख संशोधन कार्यक्रम आहे. यामध्ये आरोग्य, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, हवामान बदल, ऊर्जा, औद्योगिक विकास आणि जैव-अर्थव्यवस्था अशा महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश आहे. या करारामुळे भारतीय संशोधक आणि संस्थांना युरोपीय संशोधन प्रकल्पांसाठी थेट निधी मिळवण्याची तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पांचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. भारतीय विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग आणि नवउद्योजकांना युरोपमधील वैज्ञानिक संस्थांसोबत काम करता येईल. त्र, या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. वाटाघाटी पूर्ण झाल्या असल्या तरी औपचारिक करारावर स्वाक्षरी आणि दोन्ही बाजूंच्या आवश्यक प्रक्रिया पूर्ण होणे बाकी आहे. जानेवारी २०२७ पासून भारताचा सहभाग सुरू करण्याचे नियोजन आहे. तसेच या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी भारतालाही आर्थिक योगदान द्यावे लागणार आहे. भारत किती निधी देणार, याचा तपशील अद्याप जाहीर झालेला नाही. दरम्यान, भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यातील मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी जानेवारी २०२६ मध्ये पूर्ण झाल्या असून, डिसेंबरमध्ये ब्रुसेल्स येथे या करारावर औपचारिक स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. या करारातून सुमारे दोन अब्ज लोकांची संयुक्त बाजारपेठ निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. व्यापार करारातून बाजारपेठ आणि संशोधन करारातून तंत्रज्ञानाची दारे खुली करण्याचा भारत-युरोपचा प्रयत्न आहे. मात्र, या संधींचा प्रत्यक्ष फायदा भारतीय विद्यापीठे, संशोधक आणि उद्योगांना किती मिळतो, हे आगामी अंमलबजावणीवर ठरणार आहे.

## भारतातील गुरुद्वारांवर हल्ल्यांचे अमेरिकेचे आरोप; मोदी सरकारवर दबाव आणण्याची USCIRFची मागणी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वॉशिंग्टन :

भारतातील धार्मिक स्वातंत्र्य आणि अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा भारत-अमेरिका संबंधांच्या केंद्रस्थानी आला आहे. भारतातील शीख गुरुद्वारांवर गेल्या काही आठवड्यांत जमावाकडून हल्ले झाल्याचा गंभीर आरोप अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाच्या (णडउखठऋ) दोन अधिकाऱ्यांनी केला आहे. या घटनांमध्ये धार्मिक नेत्यांना लक्ष्य करण्याचे प्रयत्न झाल्याचाही दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दोषींना जबाबदार धरण्यासाठी अमेरिकन सरकारने भारत सरकारवर दबाव आणावा, अशी मागणी आयोगाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे.

अमेरिकेचे आयुक्त डेव्हिड अँडरसन यांनी सोशल मीडियावर म्हटले की, भारतातील शीख गुरुद्वारांना गेल्या काही आठवड्यांपासून जमावाच्या हिंसक हल्ल्यांना सामोरे जावे लागत आहे. धार्मिक नेत्यांना इजा पोहोचवण्याचे प्रयत्नही झाल्याचा त्यांचा दावा आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेने भारताला दिल्या जाणाऱ्या सुरक्षा मदतीचा संबंध धार्मिक स्वातंत्र्याच्या संरक्षणातील भारताच्या कामगिरीशी जोडावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

णडउखठऋचे दुसरे आयुक्त जो ग्रोगन यांनीही या मुद्द्यावर भूमिका मांडली. भारतातील चर्च, गुरुद्वारे आणि मशिदी यांसारख्या धार्मिक स्थळांवरील हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्यात मान्यता असलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारांचे उल्लंघन करतात, असे त्यांनी म्हटले. दोषींवर कारवाई करणे आणि धार्मिक स्थळांचे संरक्षण करणे यासाठी अमेरिकन सरकारने भारत सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशी त्यांची मागणी आहे.

मात्र, या आरोपांच्या पार्श्वभूमीवर पंजाबमधील घटनांचा तपासही महत्त्वाचा ठरतो. ऑक्टोबरच्या अखेरीस लुधियाना जिल्ह्यातील गागर आणि राजोआना कलां येथील दोन गुरुद्वारांमध्ये गोळीबाराच्या घटना घडल्या होत्या. पहिल्या प्रकरणात गुरुद्वाराच्या प्रमुख सेवेदारानेच पोलीस संरक्षण मिळवण्यासाठी गोळीबार घडवून आणल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. दुसऱ्या प्रकरणातील संशयित आरोपीचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला असून त्याबाबत दंडाधिकारी चौकशी सुरू आहे. त्यामुळे या घटनांमागे धार्मिक द्वेष असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नाही.

दरम्यान, भारत सरकारने णडउखठऋला पक्षपाती आणि विश्वासार्हता नसलेली संस्था म्हटले आहे. १९९८ मध्ये स्थापन झालेल्या या आयोगाच्या शिफारशी अमेरिकन परराष्ट्र विभागावर बंधनकारक नाहीत.

धार्मिक स्थळांवरील हल्ल्यांचे आरोप, पोलिसांच्या तपासातील निष्कर्ष आणि अमेरिकेची संभाव्य सुरक्षा मदतीवरील भूमिका यामुळे हा मुद्दा आता केवळ धार्मिक स्वातंत्र्यापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो भारत-अमेरिका संबंधांशीही जोडला गेला आहे.

## अमेरिकन काँग्रेसमध्ये रो खन्ना यांचा मोदी सरकारला संदेश; 'हिंदू राष्ट्रवादाला विरोध'

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

अमेरिकेच्या राजकारणात भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांचे अधिकार आणि लोकशाहीच्या स्थितीवरून पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. अमेरिकन काँग्रेसचे सदस्य रो खन्ना यांनी भारतातील 'हिंदू राष्ट्रवादा'ला आपला विरोध असल्याचे स्पष्ट करत विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विशेष म्हणजे, अमेरिकन काँग्रेसच्या निवडणुकीत कॅलिफोर्नियातून पुन्हा विजय मिळवल्यानंतर अवघ्या एका दिवसात त्यांनी ही भूमिका मांडली आहे.

रो खन्ना यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, मी हिंदू राष्ट्रवादाचा ठामपणे निषेध केला आहे आणि भ्रष्टाचाराविरोधात तसेच सर्वसमावेशकतेच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. माझे आजोबा गांधींच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते. महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्या सर्वसमावेशक विचारांवर माझा विश्वास आहे. त्यांची ही प्रतिक्रिया भारतातील हिंदुत्व, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय भूमिकेबाबत स्पष्टीकरण मागणाऱ्या एका सोशल मीडिया वापरकर्त्याला उत्तर देताना आली.

रो खन्ना यांच्या विधानाचे महत्त्व त्यांच्या राजकीय पदामुळे अधिक वाढले आहे. ते अमेरिकन प्रतिनिधिगृहातील 'काँग्रेसनल कॉकस ऑन इंडिया अँड इंडियन अमेरिकन्स'चे सह-अध्यक्ष आहेत. यापूर्वी त्यांनी भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्यासाठी काम केले आहे. २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणाला उपस्थित राहण्यासाठी भारत सरकारच्या निमंत्रणावरून त्यांनी अमेरिकन खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्वही केले होते. त्यामुळे भारतातील राजकीय घडामोडींवर त्यांनी घेतलेली ही भूमिका विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

दरम्यान, त्याच दिवशी अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने (णडउखठऋ) भारतातील शीख गुरुद्वारांवर झालेल्या कथित हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली. आयोगाचे आयुक्त डेव्हिड अँडरसन यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी भारत सरकारच्या भूमिकेशी अमेरिकेची सुरक्षा मदत जोडण्याची मागणी केली. मात्र, पंजाब पोलिसांनी संबंधित घटनांमध्ये धार्मिक हेतू असल्याचे नाकारले असून एका प्रकरणात गुरुद्वारा कर्मचाऱ्यांचाच सहभाग असल्याचे तपासात म्हटले होते.

रो खन्ना यांच्या विधानावर माहिती व प्रसारण मंत्रालयाचे वरिष्ठ सल्लागार कांचन गुप्ता यांनी टीका केली. दुसरीकडे, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या दोन्ही घटनांवर अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नव्हती.

अमेरिकेतील भारताच्या प्रभावशाली राजकीय मित्रांकडूनच आता धार्मिक बहुलतावाद, विद्यार्थी आंदोलन आणि अल्पसंख्याकांच्या अधिकारांवर प्रश्न उपस्थित होत असल्याने भारत-अमेरिका राजनैतिक संबंधांच्या चर्चेत या मुद्द्यांना नवे महत्त्व प्राप्त झाले आहे.

## 'केंद्र सरकारचा तारीख पे तारीख'चा उपरोधिक कारभार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

राजधानी दिल्ली आणि संपूर्ण छउठ भागात महिलांच्या सुरक्षेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. बलात्कार आणि लैंगिक अत्याचाराच्या घटनांनी सीमा ओलांडल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने स्वतः हून या प्रकरणाची दखल घेतली. पण ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात काय घडलं? केंद्रातील महासत्ताक सरकारला महिला सुरक्षेसारख्या संवेदनशील विषयावर एक 'अर्थपूर्ण' उत्तर दाखल करायलासुद्धा पुन्हा एकदा मुदतवाढ हवी आहे! न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या विनंतीवरून केंद्र सरकारला आता २३ नोव्हेंबर २०२६ पर्यंतची नवीन मुदत बहाल केली आहे.

म्हणजेच, दिल्लीच्या रस्त्यांवर महिलांची सुरक्षा धोक्यात असताना प्रशासन मात्र प्रतिज्ञापत्र मसुदा तयार करण्यातच 'व्यस्त' आहे, हेच यातून सिद्ध होतं!

* *२८ सप्टेंबर २०२६:* दिल्ली-NCR मधील (विशेषतः आस्था कुंज पार्क आणि लेडी श्री राम कॉलेज परिसरातील) धक्कादायक बलात्कार प्रकरणांची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने **'In Re: Recent Rape Incidents in Delhi NCR' (Suo Motu Writ Petition Criminal No. 6/2026)** नावाने स्वतः हून याचिका दाखल करून घेतली.

* *५ ऑक्टोबर २०२६:* न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सुनावलं होतं की, ''फक्त गुन्ह्यानंतर कारवाई करून चालणार नाही, तर गुन्हे रोखणे आणि महिलांनहे आमचे प्राधान्य आहे.'' न्यायालयाने पोलीस वॉर रूम, सीसीटीव्ही (CCTV) देखरेख, बीट गस्त आणि '११२' इमर्जन्सी रिस्पॉन्स यंत्रणेचा कसून आढावा घेण्याचे निर्देश दिले होते. वरिष्ठ वकील लिझ मॅथ्यू यांची अमिकस क्युरी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

* *६ नोव्हेंबर २०२६:* न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्र सरकारला ६ नोव्हेंबरपर्यंत सविस्तर उत्तर सादर करायचे होते. मात्र, न्यायालयाच्या पटलावर 'उत्तर तयार नाही' हेच पालुपद ऐकायला मिळालं.

राजधानीत 'बेटी बचाओ'चे मोठे बॅनर आणि घोषणा रोज हवेत तरंगताना दिसतात. मात्र, प्रत्यक्ष न्यायालयाच्या दारात जेव्हा उत्तर देण्याची वेळ येते, तेव्हा यंत्रणेची चक्रे इतकी मंदावतात की त्यांना एका अहवालासाठी महिन्यांचा कालावधी लागतो. न्यायालयाने सरकारला 'अर्थपूर्ण' उत्तर देण्यासाठी २३ नोव्हेंबर २०२६ पर्यंतची अंतिम मुदत दिली असून, अमिकस क्युरींना त्या उत्तराचा अभ्यास करण्यासाठी वेळ देऊन या प्रकरणाची पुढील सुनावणी आता *२ डिसेंबर २०२६* रोजी निश्चित केली आहे.

पोलीस ठाण्यांमधील सीसीटीव्ही कॅमेरे चालू आहेत का? रस्ते आणि उद्यानांमध्ये प्रकाश व्यवस्था (Street lights) आहे का? आणि नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोचा (NCRB) लैंगिक गुन्हेगारांचा डेटाबेस फक्त फाईलींमध्येच धूळ खात पडून आहे का? या थेट प्रश्नांची उत्तरे देण्यास केंद्र सरकार टाळाटाळ करत आहे, असाच याचा अर्थ होतो.

न्यायमूर्ती पारडीवाला यांनी मागील सुनावणीत कडक शब्दांत खडसावले होते की, ''भारतासारख्या देशात सुरक्षेचे उपाय केवळ कागदावर ठेवून चालणार नाहीत, प्रत्यक्ष जमिनीवर काम करावे लागेल.'' परंतु, ६ नोव्हेंबरच्या सुनावणीतील मुदतवाढीने प्रशासकीय अनास्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणली आहे.

दिल्लीतील महिलांना सुरक्षा आणि न्याय कधी मिळणार, यापेक्षा सरकारी वकिलांना प्रतिज्ञापत्र दाखल करायला अजून किती मुदती लागणार, हाच आता मुख्य प्रश्न बनला आहे. २ डिसेंबर २०२६ च्या सुनावणीत तरी सरकार ठोस कृती आराखडा सादर करणार की पुन्हा एकदा नव्या तारखेची मागणी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

■ सोलापूर :

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आयोजित राज्यव्यापी 'आरोग्य संवाद यात्रे'चा ' जिल्हास्तरीय टप्पा आज सोलापूर जिल्ह्यामध्ये उत्साहात संपन्न झाला. राज्याची ही ३५ दिवसांची आरोग्य संवाद यात्रा १ नोव्हेंबर रोजी नांदेड येथून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू झाली असून, १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज सोलापूर जिल्ह्यात या यात्रेला नागरिक व लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहकार्य केले.

या यात्रेदरम्यान आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी महिला व बाल शासकीय रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, ट्रॉमा केअर रुग्णालय कुर्डूवाडी, पिंपळनेर प्राथमिक आरोग्य केंद्र (ता. माढा), टेंभुर्णी प्राथमिक आरोग्य केंद्र (ता. माढा), प्राथमिक आरोग्य केंद्र अकोला (ता. सांगोला), ट्रॉमा केअर हॉस्पिटल (ता. सांगोला) अशा विविध आरोग्य संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, रुग्ण आणि नागरिकांशी थेट संवाद साधून आरोग्य यंत्रणेतील अडचणी जाणून घेतल्या. या ३५ दिवसांच्या यात्रेदरम्यान राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमधील औषधसाठा, वैद्यकीय उपकरणे, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता, स्वच्छता, रुग्णालय व्यवस्थापन आणि उपचार सुविधांचा आढावा घेण्यात आला.